CNR NO - MHCH090003852025

| | | |
|---|---|---|
| दाखल दिनांक | : | १६.०६.२०२५ |
| नोंदणी दिनांक | : | १६.०६.२०२५ |
| निकाल दिनांक | : | ०१.०६.२०२६ |
| कालावधी | : | वर्ष महिने दिवस<br>०० ११ १५ |

## न्यायदंडाधिकारी प्रथम वर्ग, गोंडपिपरी यांचे न्यायालय, ता. गोंडपिपरी, जि. चंद्रपूर

(पिठासीन अधिकारी यु. पी. शिंदे)

सं.फौ.प्र.क्र. २४५/२०२५ निशाणी क्र.२०

महाराष्ट्र शासन मार्फत
पोलीस स्टेशन अधिकारी,
पोलीस स्टेशन गोंडपिपरी,
ता. गोंडपिपरी जिल्हा. चंद्रपूर ....अभियोगपक्ष

-विरुध्द-

खुशाल मारोती तेलसे,
वय- ६५ वर्षे, व्यवसाय – शेती
रा. वढोली, ता. गोंडपिपरी,
जि. चंद्रपूर

......आरोपी

गुन्हाः महाराष्ट्र दारुबंदी कायदा कलम ६५ **(ई)** अन्वये

अभियोग पक्षातर्फे विधिज्ञ - श्री. आर.बी.धात्रक
आरोपीतर्फे विधिज्ञ - श्री. एम.यु.काळे

## न्यायनिर्णय

(घोषीत दिनांक ०१ जुन, २०२६ रोजी)

प्रस्तुत प्रकरणात आरोपी महाराष्ट्र दारूबंदी कायदा १९४९, कलम ६५(ई) अन्वये संपरिक्षेचा सामना करीत आहे.

**०२.** प्रस्तुत प्रकरणात गु.र.क्र./८७/२०२५ पोलीस स्टेशन, गोंडपिपरी, ता. गोंडपिपरी येथे नोंदवून तपास श्री. देविदास सुरपाम यांनी केला. तपासादरम्यान त्यांनी साक्षीदारांचे बयाण नोंदवीले व आरोपीविरुद्ध दोषारोपपत्र दाखल केले.

०३. माझे विद्वान पुर्वाधिकारी यांनी आरोपीविरुद्ध महाराष्ट्र दारूबंदी कायदा १९४९, कलम ६५(ई) अन्वये गुन्ह्याचा तपशील नि.क्र.११ वर नोंदविला. आरोपीने

प्रतिकथन नाकारल्यामुळे त्याचेविरुद्ध खटला चालविण्यात आला.

०४. उभय पक्षांचा युक्तीवाद ऐकला. निर्णीतीसाठी उद्भवलेले मुद्दे त्यावरील निष्कर्ष व निष्कर्षाची कारणमिमांसा पुढील प्रमाणे.

| अ.क्र. | मुद्दे | निष्कर्ष |
|---|---|---|
| १. | अभियोग पक्ष असे सिद्ध करतो काय की, दि. १५/०५/२०२५ रोजी १८.३७ ते १९.०० वाजताच्या सुमारास मौजा वढोली, ता. गोंडपिपरी, जिल्हा चंद्रपूर येथे आरोपी याचे ताब्यात २२ नग प्रत्येकी ९० मि.ली. रॉकेट संत्रा देशी दारू विनापरवाना व अवैधरित्या विक्री करण्याच्या उद्देशाने बाळगून असतांना मिळून आली ? | नाही |
| २. | आदेश काय ? | **अंतिम आदेशानुसार** |

<u>का र ण मि मां सा</u>

०५. आरोपीविरुद्ध गुन्हा सिद्ध करण्याकरीता अभियोग पक्षातर्फे फिर्यादी सा.क्र.१ कुष्णा शैलेंद्र रॉय व पंच सा.क्र.२ शामराव रामुजी पोपरे यांची साक्ष नोंदविण्यात आली. अभियोग पक्षास पुरेशी संधी देऊनही अभियोग पक्ष इतर साक्षीदारांना हजर ठेऊन त्यांचा साक्षपुरावा नोंदविण्यास असमर्थ ठरला. करीता, <u>नि.क्र.१</u> वर आदेश पारीत करुन सरकार पक्षाचा पुरावा बंद करण्यात आला.

०६. आरोपीचे फौजदारी प्रक्रीया संहितेचे कलम ३१३(१)(ब) अन्वये निवेदन नोंदविण्यात आले.

<u>मुद्दा क्र.१ करीता</u> :-

०७. साक्षदार क्र.१ कुष्णा शैलेंद्र रॉय यांना फिर्यादी या नात्याने तपासण्यात आलेले असून, त्यांनी घटनेच्या वेळी पंचांसमक्ष आरोपीच्या ताब्यातून दारू जप्त केल्याचे कथन केलेले आहे. तद्वतच, त्यांनी रासायनिक पृथःकरणाकरीता सिलबंद केलेल्या नमून्याचे पुढे काय केले, याबाबत कोणतेही कथन त्यांच्या पुराव्यादरम्यान केलेले नाही. त्यामुळे त्यांचा साक्षपुरावा हा संशयापलीकडे नाही.

**०८.** साक्षदार क्र.२ शामराव रामुजी पोपरे हे पंच साक्षिदार असून त्यांनी सरतपासादरम्यान पोलीसांनी घटनास्थळावर त्यांच्या समक्ष पंचनामे तयार केलेले असल्याचे कथन केलेले आहे. परंतु, त्याने त्याच्या साक्षीमध्ये असे कथन केले आहे की, आरोपी हा वढोली ते फुर्डीहेटी रोडवर त्याच्या असलेल्या शेताच्या मध्ये असलेल्या घराच्या बाजुला तो दारुची विक्री करत होता. त्यावेळी त्यांनी चंद्रपूर येथे सी.आर.ओ. यांना त्याबाबत

फोनकरुन कळवले. त्यानंतर गोंडपिपरी वरुन पोलीसांची गाडी आली. तेथे बाजुला त्याचे तनसीचे ढग आहे. त्यामध्ये आरोपीने दारु लपुन ठेवलेली होती. पोलीस आले त्याला पकडले त्यावेळी ते तेथे हजर होते. तो पंचनामा एक दीड महिन्यापुर्वी केला होता. त्याची वेळ सायंकाळी ५.३० ते ६ अशी होती. त्यांनी उलटतपासादरम्यान ते पुर्वी पोलीस विभागामध्ये काम करत होते. ते राजुरा पोलीस स्टेशन मधुन ए.एस.आय. असताना सेवानिवृत्त झाले तसेच त्यांनी मान्य केले की, ते पोलीस विभागात काम करत असल्यामुळे गोंडपिपरी पोलीस स्टेशनचे अधिकारी व पोलीस त्यांच्या ओळखीचे आहेत. त्यांनी इतर सुचक प्रश्न नाकारले.

**०९.** अभिलेखावरील साक्षीदारांच्या साक्षेचे अवलोकन केले असता असे दिसून येते की, सा.क्र.१ फिर्यादी यांच्या साक्षेद्वारे आरोपीविरूद्धचा गुन्हा सिद्ध होऊ शकला नाही. त्यामुळे घटनास्थळ व जप्त पंचनामे पुर्णपणे सिद्ध झाले असे म्हणता येणार नाही. सा.क्र. २ यांनी त्यांच्या उलटतपासात त्यांनी पोलीस विभागामध्ये काम करत असल्याचे व पोलीस स्टेशनचे अधिकारी तसेच पोलीस त्यांच्या ओळखीचे असल्याचे त्यांनी कथन केले आहे. त्यामुळे सदरचे साक्षीदार यांचे पोलीसांशी चांगले संबंध असल्याचे दिसुन येते. त्यामुळे केवळ सदर साक्षीदाराच्या साक्षवरून सदरचा मुद्देमाल आरोपीच्या ताब्यातून जप्त केला किंवा संशयापलीकडे जाऊन सिध्द होत नाही. अभियोग पक्षातर्फे रासायनिक पृथ:करणाचा अहवाल दाखल करण्यात आलेला आहे. त्यामुळे जप्त मुद्देमाल ही दारूच होती ही बाब सिद्ध झालेली आहे. परंतु, सदरहू दारू ही आरोपीच्याच ताब्यातुन जप्त केली होती, ही बाब पुराव्याअभावी सिद्ध होऊ शकली नाही. तसेच जप्त नमुने रासायनिक विश्लेषणाच्या कार्यालयात घेऊन जाणारा कोणताही साक्षीदार तपासलेला नाही. त्यामुळे नेमके कोणते जप्त नमुने रासायनिक विश्लेषणासाठी पाठविले होते, हे स्पष्ट होत नाही. त्यामुळे अभियोग पक्ष आरोपी हे स्वतःजवळ अवैधरित्या दारू बाळगून असतांना मिळून आले होते, ही बाब सिद्ध करण्यास अपयशी ठरला आहे, असे मत नोंदवून मी मुद्दा क्र.१ चे उत्तर 'नकारार्थी' देत आहे.

**<u>मुद्दा क्र. २ करीता</u> :-**

**१०.** मुद्दा क्र. १ च्या नकारार्थी निष्कर्षास अनुसरून आरोपी निर्दोष सुटण्यास प्रात्र आहेत. सबब, मुद्दा क्र. २ च्या उत्तरार्थ खालीलप्रमाणे आदेश पारीत करण्यात येते.

आदेश

१. आरोपी खुशाल मारोती तेलसे यांची फौजदारी प्रक्रिया संहितेचे कलम २५५(१) नुसार महाराष्ट्र दारुबंदी कायद्याचे कलम ६५(ई) खालील आरोपातून निर्दोष मुक्तता करण्यात येते.

२. जप्त मुद्देमाल एकुण २२ नग प्रत्येकी ९० मि.ली. देशी दारू विल्हेवाटीकरीता आवाहनाचा कालावधी संपुष्ठात आल्यानंतर अधिक्षक, राज्य उत्पादन शुल्क, चंद्रपूर येथे पाठविण्यात यावी.

३. आरोपीचे जात मुचलके व बंधपत्रे रद्द करण्यात येत आहे.

४. आरोपीने रक्कम रू.१५,०००/- चे वैयक्तीक बंधपत्र देऊन फौजदारी प्रकिया संहिता चे कलम ४३७-अ अन्वये पुर्तता करावी.

**(**न्यायनिर्णय हा खुल्या न्यायालयात घोषीत करण्यात आला**.**)

(Sd-)
**(उमाकांत पी. शिंदे)**
न्यायदंडाधिकारी, प्रथम श्रेणी,
गोंडपिपरी

स्थळ :- गोंडपिपरी
दिनांक :- ०१/०६/२०२६

**<u>प्र मा ण प त्र</u>**

मी प्रमाणित करते की या पि.डी.एफ. करून अपलोड केलेल्या न्यायनिर्णयामधील शब्द-नि-शब्द हे मुळ न्यायनिर्णयाप्रमाणे आहे.

| | | |
|---|---|---|
| लघुलेखकाचे नांव | : | उमेश रामप्रसाद आमटे, लघुलेखक श्रेणी-३. |
| न्यायालयाचे नांव | : | न्यायदंडाधिकारी, प्रथम वर्ग, गोंडपिपरी. |
| न्यायनिर्णयाची तारीख | : | ०१.०६.२०२६ |
| न्यायनिर्णयावर पिठासीन अधिकारी यांनी स्वाक्षरी केल्याची तारीख | : | ०१.०६.२०२६ |
| न्यायनिर्णय अपलोड केल्याची तारीख | : | ०१.०६.२०२६ |